॥ तूं अबोल होउन ॥

गायिकाः कृष्णा कल्ले
गीतः गुरुनाथ शेणई
संगीत श्रीनिवास खळे

तूं अबोल होउन जवळी मजला घ्यावे,
मीं भान विसरुनी धुंद चांदणें प्यावें ॥ धृ. ॥

ही विशाल अवघी मृदुल असावी धरती
चांदवा रेशमी गर्द जांभळा वरती
वर चंद्र रुपेरी झुंबर एक झुलावें ॥ १ ॥

क्षितिजांत झळकता मंद केशरी तारा
अंगावर घ्याव्या धवल दुधाच्या धारा।
त्या धारांनी चिंब मला भिजवावें ॥ २ ॥

कचबंध मोकळा तुझ्या करांनी व्हावा
मधुगंध, मंदसा बकुलफुलांनी द्यावा।
तूं चंद्रबनातिल स्वप्निंल रंग टिपावे ॥ ३ ॥

सुकुमार साजरी झुळुक लाजरी यावी
हळुं रातराणिचा बहर उधळुनी जावी
हें धुंद निरामय वैभव तूं फुलवावें ॥ ४ ॥